**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**श्रेयस योजनेच्या अंमलबजावणी बाबत संबंधितांना सूचना**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाविद्यालयातील अतांत्रिक अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासनाकडून श्रेयस शिकाऊ उमेदवार योजना सुरू करण्यात आली आहे.

महाविद्यालयांनी योजनेच्या अंमलबजावणीकरीता श्रेयस पोर्टल www.shreyas.ac.in तयार करण्यात आले आहे. योजनेसंदर्भात वेळापत्रक केंद्र शासनाच्या सूचनांमध्ये देण्यात आले असून त्यानुसार महाविद्यालयाने नोंदणी करणे आवश्यक आहे. संबंधित महाविद्यालयातील करीअर कॉऊन्सिलींग सेल / प्लेसमेंट सेलच्या समन्वयकांमार्फत विद्यार्थ्यांची नांव नोंदणी दिनांक २५ मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

योजनेसंदर्भात केंद्र शासनाच्या सूचनांबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र पाठवून कळविले आहे. तरी महाविद्यालयांनी अतांत्रिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पोर्टलवर नांव नोंदणी करण्यासंदर्भात सूचित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास व संचालनालयास vishi.dhepune@nic.in तसेच directorsd@sgbau.ac.in या ई-मेलवर लवकरात लवकर पाठवावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २७/०२/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी